शनिवार दि.८ फेब्रुवारी २०२५

हे शब्द आज माझे झाले मुके तरीही !
ते बोलतील भाषा हमखास वादळाची !!
-ॲड.डॉ विजयकुमार कस्तुरे चिखलीकर

दैनिक बीड लोकनेता

जनसामान्य माणसाचे हक्काचे व्यासपीठ

मुख्यसंपादक : ज्ञानेश्वर बुधवत संपादक : ज्ञानेश्वर मुंढे

सुवर्णसंधी...! दैनिक लोकनेता सुवर्णसंधी...!
पत्रकार होण्यासाठी सुवर्ण संधी
दैनिक लोकनेता (जनसामान्य माणसाचे हक्काचे व्यासपीठ)
अल्पावधीतच वाचकांच्या लेखकांच्या पसंतीत उतरलेल्या दैनिक लोकनेता साठी संपूर्ण महाराष्ट्रात जिल्हा, तालुका शहर व गाव पातळीवर प्रतिनिधी नेमणे आहे.अनुभवी व विनाअनुभवी इच्छुकांनी त्वरित संपर्क साधावा !
संपर्क :- संपादक ८४५९९७७९०४

RNI-MAHMAR/2023/89402 Email : elokneta@gmail.com वर्ष : ०२ अंक :१४३ किंमत २ रुपये Lokneta News - लोकनेता न्युज 8459977904 epaper.lokneta.in

# राखेच्या बेकायदेशीर साठ्यांवर कारवाई करा:पर्यावरण मंत्री पंकजा मुंडेंचे जिल्हा प्रशासनाला स्पष्ट आदेश

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**बीड (वृत्तसंस्था)**



प्रदूषणाच्या नियमाचा भंग होत असल्याने औष्णिक विद्युत केंद्राच्या परिसरातील राखेच्या बेकायदेशीर साठ्यांवर कारवाई करण्याचे स्पष्ट आदेश राज्याच्या पर्यावरण व वातारणीय बदल तसेच पशुसंवर्धन मंत्री पंकजा मुंडे यांनी आज जिल्हा प्रशासनाला दिले. जप्त केलेली वाळू शासकीय घरकुलाच्या बांधकामासाठी उपलब्ध करून द्यावी असे निर्देशही देत प्रदुषण नियंत्रणाकडे दुर्लक्ष करत असलेल्या अधिकाऱ्यांची त्यांनी कान उघाडणी केली.जिल्हाधिकारी कार्यालय येथे आज प्रगती सभागृहात जिल्हयातील अवैध वाळू व तत्सम गौण खनिज उत्खणनामुळे होणारा पर्यावरणाचा ऱ्हास, बीड जिल्हयातील अवैध डोंगर पोखरल्यामुळे होणारी पर्यावरणाची हानी तसेच औष्णिक वीज प्रकल्प, परळी येथे होणा-या राखेच्या वाहतुकीमुळे होणारे प्रदुषण आदी विषयांवर ना. पंकजा मुंडे यांनी सर्व संबधित अधिकाऱ्यांची बैठक घेतली.वीट भट्यासाठी मोकळ्या हायवामधून होणा-या अवैध वाहतुकीमुळे प्रदुषण वाढत असून याचा परिणाम नागरिकांच्या आरोग्यावर होत आहे तसेच खाली सांडलेल्या राखेमुळे वातवरणीय बदल रोखण्यासाठी बंद हायवामधून ही वाहतूक होईल याकडे संबधितांनी लक्ष घालून तसा अहवाल सादर करावा, अशा सूचना त्यांनी दिल्या.

चिमणीपासूनचे प्रदुषण नियत्रंणात असले तरी राख उचलणे हे संबधित अधिका-यांचे दायित्व आहे याकडे दुर्लक्ष करुन चालणार नाही. राखेचे अनाधिकृत साठे सील करावेत. वाहतुकीचे नियम सर्वांनी पाळावेत, राखेची वाहतुक गावातुन न करता ती बायबासनी करावी. दाऊतपूर एरियामध्ये किती राख आहे. याचे रेकार्ड ठेवणे राखेचा साठा आजमितीला आहे तेवढाच पुढील तपासणीपर्यंत असायला हवा नसता संबधितावर जबाबदारी निश्चित करण्यात येईल, असेही याप्रसंगी ना. पंकजा मुंडे यांनी सांगितले.वाळू, दगड, माती, मुरुम इत्तर खडी याची अवैध वाहतूक करणा-या किती लोकांवर कारवाई केली तसेच वाळू घाटाची संख्या किती. जप्त केलेली वाळू ही पंडीत दीन दयाळ उपाध्याय घरकूल योजनेसाठी वापरावी. गौण खणिजाचे अवैध उत्खणनावर प्रतिबंध घालावा असेही यावेळी त्या म्हणाल्या.

डोंगराचे अवैध उत्खनन करणा-यानां दंड करावा, दर तीन महिन्याला याचा अहवाल सादर करावा. डोंगराखाली होणारी प्लॉटींग अवैध असल्यास त्यावर प्रतिबंध घालावा. डोंगर पोखरल्यामुळे खाली राहणा-या कुंटूंबावर दरड कोसळण्याची शक्यता नाकारता येत नाही. असेही त्या यावेळी म्हणाल्या.या बैठकीस जिल्हाधिकारी अविनाश पाठक, जिल्हा पोलीस अधिक्षक नवनीत कॉवत,निवासी उपजिल्हाधिकारी शिवकुमार स्वामी, उपविभागीय अधिकारी कविता जाधव संबधित विभागाचे अधिकारी उपस्थित होते. मंत्री महोदयांना पॉवर पाईटव्दारे (पीपीटीव्दारे) माहिती देण्यात आली बैठकीचे प्रस्ताविक आभार जिल्हाधिकारी अविनाश पाठक यांनी मानले.

# बाजीराव पाटील यांची दै.लोकनेताच्या मराठवाडा विभागीय संपादक पदी निवड

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**नांदेड । प्रतिनिधी**



जिल्हाचे दैनिक लोकनेता पेपर चे निर्भिड पत्रकार गरीबांचे कैवारी कळका ता.कंधार जि.नांदेड येथील भुमीपुत्र बाजीराव पाटील गायकवाड यांची मराठवाडा विभागीय संपादक म्हणून दैनिक लोकनेता चे मुख्य संपादक ज्ञानेश्वर बुधवत व संपादक ज्ञानेश्वर मुंडे यांनी सामाजिक, राजकीय, भ्रष्टाचार, गुन्हे, प्रशासकीय बातम्या मराठवाडा विभागातील चालू घडामोडी व अन्य सर्व प्रकारच्या बातम्या विविध समस्या जनतेपर्यंत पोहोचवून शासन आणि प्रशासन यांच्या कडे त्यांच्या समस्या सोडवण्यासाठी मराठवाडा विभागीय संपादक या पदावर नियुक्ती केली आहे.या महान कार्यात २ फेब्रुवारी २०२५ रोजी सहभागी करून दैनिक लोकनेता पेपर मराठवाड्यातील प्रत्येक जिल्ह्यात, तालुक्यात, गावागावांपर्यत प्रतिनिधी च्या माध्यमातून पेपर पोहचवण्यासाठी मुख्य संपादक ज्ञानेश्वर बुधवत यांनी म.वि.संपादक पदाची जबाबदारी दिली असून झालेल्या निवडीबद्दल खालील मान्यवरांनी हार्दिक शुभेच्छा देऊन अभिनंदन केले आहे.! कळका नगरीचे भुमिपत्र कंधार लोहा विधानसभेचे आमदार प्रतापराव पाटील चिखलीकर (कळकेकर), दक्षिण नांदेड विधानसभेचे आमदार श्री आनंदराव पाटील बोंढारकर, मुंबई उच्च न्यायालयाचे माजी न्यायमूर्ती मारोतराव पाटील गायकवाड कळकेकर, समाज उन्नती शिक्षण संस्थेचे अध्यक्ष मारोतीराव निवृत्तीराव पाटील घोरबांड, व्हिपीके उद्योग समूहाचे सर्वेसर्वा चेअरमन श्री मारोतराव पाटील कवळें गुरुजी, श्री बालाजी फिल्डवेल सोसायटी चे तांत्रिक सल्लागार श्री अशोकराव डावकोरे, परफेक्ट इंग्लिश स्कूल चे सर्वेसर्वा गोविंदराव केंद्रे, शिवसेना उपजिल्हाप्रमुख भालचंद्र नाईक, पत्रकार, शिक्षक,पोलिस, महसूल विभाग, गावकरी मंडळी, वकील, सरपंच, चेअरमन, उपसरपंच, व्हा.चेअरमन,ग्रामपंचायत सदस्य ,स्नेही पाहुणे मंडळी यांनी शुभेच्छा दिल्या आहेत.

# पाटोदा तालुक्यातील मेंगडेवाडी गावात बिबट्याच्या हल्ल्यात महिलेचा मृत्यू

## वनविभाग व पोलीस प्रशासन घटनास्थळी दाखल

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**बीड । विजय रोडे**




पाटोदा तालुक्यातील मेंगडेवाडी गावातील उखारा शिवारात आज दि.६ गुरूवार रोजी दुपारी बिबट्याच्या हल्ल्यात श्रीमती सोजरबाई धोंडीराम बोबडे वय ६५ वर्षे या वयोवृद्ध महिलेचा मृत्यू झाला असुन या परीसरात बिबट्याची दहशत पसरली आहे. वनविभाग आणि पोलिस प्रशासनाला याची फोनवरून भगवान शिंदे यांना कळविण्यात आले आहे,भगवान शिंदे यांच्या म्हणण्यानुसार श्रीमती सोजरबाई धोंडीराम बोबडे या दुपारी १२ वाजता शेतातील जनावराच्या गोठ्यात नेहमीप्रमाणे जात असतात. आज दुपारी ३ वाजता बिभिषण दासु शिंदे यांनी शेतातील जनावरे आणण्यासाठी जात असताना त्यांच्या गोठ्याशेजारी शेतात सोजरबाई यांचे प्रेत पाहीले.त्यांच्या अंगावरील जखमावरून बिबट्याने नरडीचा घोट घेतल्याचे दिसून आले. शेतात बिबट्याचे ठसे दिसुन आले.त्यांनी सोजरबाई यांच्या नातु जगन्नाथ बबन बोबडे यांना फोनवरून कल्पना दिली.त्यानंतर घटनास्थळी ग्रामस्थांनी धाव घेतली. भगवान शिंदे यांनी पाटोदा वनविभागाचे अधिकारी आरएफओ श्रीकांत काळे ( मो.नं.९०७५४९५७६१ ) व पोलीस प्रशासन पोलिस निरीक्षक जाधव ( मो.नं. ७७२२०३५२०९ )यांना फोन वरून कल्पना दिली. सायंकाळी पाटोदा पोलीस प्रशासनाचे अधिकारी पोलिस उपनिरीक्षक आदिनाथ भडके व बीट अंमलदार बाळासाहेब वाघ पाटोदा यांनी घटनास्थळी भेट देऊन स्थळ पंचनामा केला. वनविभागाचे आरएफओ श्रीकांत काळे घटनास्थळी दाखल झाले आहेत. प्रेत शवविच्छेदनासाठी पाटोदा ग्रामीण रुग्णालयात पाठविण्यात आले आहे.

# अनंत कराड यांना आदर्श साहित्यिक पुरस्कार प्रदान



■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**शिरूर कासार । वार्ताहर**

एकता फाउंडेशन महाराष्ट्र राज्य चे संस्थापक अध्यक्ष तथा म.सा.प.संभाजीनगर केंद्रीय कार्यकारिणी सदस्य, जेष्ठ साहित्यिक अनंत कराड यांना तहसीलदार वैशाली पाटील (आष्टी), ह.भ.प.बहिरवाळ महाराज (मदन महाराज देवस्थान) यांच्या हस्ते स्व.मैनुद्दीन शेख आदर्श साहित्यिक पुरस्कार नुकताच प्रदान करण्यात आला. सामाजिक कार्यकर्ते स्व.मैनुद्दीन शेख यांच्या स्मरणार्थ कडा येथे आदर्श साहित्यिक, शिक्षक, पत्रकार, डॉक्टर तसेच, गुणवंत विद्यार्थी बक्षीस वितरण समारंभ आयोजित करण्यात आला होता.

साहित्यिक कराड यांची 'काळ्याई', अंदमानचा प्रवास', 'मनीच्या कविता' आणि 'हे रामा..' ही चार पुस्तके प्रकाशित झालेली असून गेल्या अनेक वर्षांपासून ते शैक्षणिक, सांस्कृतिक, सामाजिक, साहित्यिक आणि पर्यावरण क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करत आहेत. राष्ट्रीय सेवा योजना शिबीरापासून ग्रामीण, तालुका, जिल्हा, विभाग, राज्य, राष्ट्रीय आणि विश्व साहित्य संमेलनांतून त्यांनी सहभाग नोंदवला असून आजपर्यंत अनेक मानाचे पुरस्कारही त्यांना मिळालेले आहेत. त्यांच्या याच कामगिरीची दखल घेऊन आदर्श शिक्षिका तथा कवयित्री नजमा शेख यांनी आपल्या वडीलांच्या स्मृतिप्रित्यर्थ देण्यात येणारा प्रतिष्ठेचा स्व.मैनुद्दीन शेख पुरस्कार साहित्यिक कराड यांना जाहीर केला. कराड यांच्यासह पत्रकार तथा दै.झुंजारनेता चे उपसंपादक उत्तम बोडखे, आदर्श शिक्षक, कवी राजेंद्र लाड आदी दहा मान्यवरांना पुरस्कार देऊन गौरविण्यात आले.अनंत कराड यांना पुरस्कार मिळाल्याबद्दल एकता फाउंडेशन महाराष्ट्र राज्य च्या सर्व पदाधिकाऱ्यांसह, सभासद आणि कार्यकर्ते, तसेच मराठवाडा साहित्य परिषद संभाजीनगर चे सर्व पदाधिकारी, विविध शिक्षक संघटना आणि तालुका पत्रकार संघाच्या पदाधिकाऱ्यांनी त्यांचे अभिनंदन केले आहे.

# आ.राजेश पवार यांचा रविवारी उमरीत भव्य नागरी सत्कार

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**उमरी । महेश पडोळे**

नागरी सत्कार समितीच्या वतीने नवनिर्वाचित आमदार राजेश पवार भारतीय जनता पक्षाच्या महिला मोर्चाच्या जिल्हा अध्यक्ष सौ पुनम पवार यांचा रविवारी दि. ९ फेब्रुवारी रोजी सायंकाळी सात वाजता नागरी सत्कार करण्यात येणार आहे ग्रामीण भागातील सरपंच चेअरमन उमरी शहरातील व्यापारी राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष शिवसेना भाजपचे पदाधिकारी कार्यकर्त्यांच्या वतीने मोंढा मैदानावर हा सत्कार सोहळा होणार आहे तत्पूर्वी सायंकाळी पाच वाजता महादेव मंदिर येथून आमदार राजेश पवार व सौ पुनम पवार यांची मिरवणूक काढण्यात येणार आहे हेही मिरवणूक बस स्थानक नगरपालिका कार्यालय मुख्य बाजारपेठेतून मोंढा मैदानातील कार्यक्रम स्थळी पोहोचणार आहे त्यानंतर मिरवणूक विसर्जित केली जाणार आहे. या कार्यक्रमात शहरासह तालुक्यातील नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन नागरिक सत्कार समितीच्या वतीने करण्यात आले आहे.



# गोणार येथील युवकांचा येलूर येथे झालेल्या भिषण अपघातात मृत्यू

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**मुखेड । संदिप वडजे**



येलूर ते गोणार रोडवरील ऊसाचा ट्रॅक्टर व दुचाकीमध्ये झालेल्या अपघातात गोणार (ता. कंधार) येथील युवकांचा जाग्यावरच मृत्यू झाला. ही घटना शुक्रवार ६ फेब्रुवारी रोजी सायंकाळी ८ वाजताच्या सुमारास कंधार ते येलूर रोडवर घडली आहे , या घटनेमुळे गोणार येथे हळहळ व्यक्त केली जात आहे.

गोणार येथील शिवाजी पवळे वय २७ वर्ष हा कामानिमित्त मुखेडला गेला होता. परत येताना अपघात झाल्याची माहिती समजताच गोणार सुन्न झाले होते.

गोणार ते येलूर रोडवर ट्रॅक्टर (क्रमांक एमएच-२६ बी एक्स-७१९५ ) व दुचाकी (क्रमांक एमएच- २६,बी एन - ७०२१) यांच्यात धडक झाली. दुचाकीस्वार शिवाजी विश्वंभर पवळे(वय २७, रा. गोणार) याच्या अंगावरून ट्रॅक्टरचे मागचे टायर गेल्याने जाग्यावरच मृत्यू झाला. शिवाजी पवळे च्या मृतदेहावर प्राथमिक आरोग्य केंद्रात वैद्यकीय अधिकारी यांनी सकाळी १० वाजता शवविच्छेदन केले. अपघात झाल्यावर मुख्य रस्त्यावर वाहतूक खोळंबली होती. शुक्रवारी सकाळी साडेदहा वाजता गोणार येथील स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले. त्याच्या पश्चात आई , पत्नी ,मुलगी दोन महिन्यांची असा परिवार आहे.

# डॉ.सुवर्णा कराड यांचे अतुलनीय कार्य : वंजारी महासंघ महिला आघाडीच्या प्रदेशाध्यक्षपदाचा एक वर्षाचा प्रवास

लोकनेता न्यूज नेटवर्क

डॉ. सुवर्णा कराड या समाजसेवेच्या माध्यमातून महिलांच्या सशक्तीकरणासाठी कार्यरत असलेल्या प्रेरणादायी व्यक्तींपैकी एक आहेत. त्यांनी आपल्या अथक परिश्रमाने आणि समर्पणाने समाजातील महिलांना न्याय मिळवून देण्यासाठी तसेच त्यांना सक्षम बनवण्यासाठी मोलाचे योगदान दिले आहे. वंजारी महासंघाच्या महिला आघाडीच्या प्रदेशाध्यक्षपदी त्यांची निवड झाल्यानंतर गेल्या एका वर्षात त्यांनी केलेल्या कार्याचा वेध घेणे महत्त्वाचे आहे.

**संघर्षातून सशक्तीकरणाकडे वाटचाल**

डॉ. सुवर्णा कराड यांचा जीवनप्रवास संघर्षमय राहिला असला तरी त्यांनी कधीही हार मानली नाही. शिक्षण आणि सामाजिक कार्याच्या माध्यमातून त्यांनी स्वतःचे स्थान निर्माण केले. समाजातील महिलांचे जीवनमान सुधारावे, त्यांना शिक्षण आणि रोजगाराच्या संधी मिळाव्यात, त्यांच्यावर होणाऱ्या अन्यायाविरुद्ध आवाज उठवावा, या ध्येयाने त्या सदैव कार्यरत राहिल्या आहेत. वंजारी समाजातील महिलांना संघटित करून त्यांच्या न्याय्य हक्कांसाठी लढण्याची गरज ओळखून त्यांनी नेतृत्व स्वीकारले.

**वंजारी महासंघ महिला आघाडीच्या अध्यक्षपदी नेतृत्व**

महिला आघाडीच्या प्रदेशाध्यक्षपदी कार्यरत असताना डॉ. सुवर्णा कराड यांनी अनेक महत्त्वाचे उपक्रम हाती घेतले. त्यांनी महिलांसाठी विशेषतः पंचसूत्री कार्यक्रम राबवले, ज्यामध्ये हुंडाबंदी, महिला शिक्षण, कौटुंबिक हिंसाचार निर्मूलन, सामूहिक विवाह संकल्पना आणि सामाजिक जागृती यावर भर दिला.

**१. हुंडाबंदी आणि सामाजिक जाणीव**

समाजातील हुंडा प्रथेमुळे अनेक महिला शारीरिक आणि मानसिक छळाला बळी पडतात. या अन्यायाविरोधात जनजागृती करणे आणि कठोर कायदे अंमलात आणण्यासाठी प्रयत्न करणे, हा त्यांच्या कार्याचा महत्त्वाचा भाग राहिला. त्यांनी विविध व्याख्याने, परिषदा आणि जनजागृती कार्यक्रमांच्या माध्यमातून समाजाला हुंडा प्रथेच्या गंभीर परिणामांची जाणीव करून दिली.

**२. महिला शिक्षण आणि आर्थिक स्वावलंबन**

महिलांचे शिक्षण हा त्यांच्या सशक्तीकरणाचा मूलभूत आधार आहे. डॉ. सुवर्णा कराड यांनी शिक्षणातून महिलांना आत्मनिर्भर करण्यावर भर दिला. अनेक महिला शिक्षणास प्रवृत्त होण्यासाठी



त्यांनी मदत केली. त्यासोबतच, महिलांसाठी विविध कौशल्यविकास कार्यक्रम राबवून त्यांना स्वयंरोजगाराच्या संधी उपलब्ध करून दिल्या.

**३. कौटुंबिक हिंसाचारविरोधात जनजागृती**

कौटुंबिक हिंसाचार ही अनेक महिलांसाठी मोठी समस्या आहे. मात्र, भीतीपोटी किंवा समाजाच्या दडपशाहीमुळे अनेक महिला याविरोधात आवाज उठवत नाहीत. डॉ. सुवर्णा कराड यांनी अशा महिलांना आधार देण्यासाठी विशेष सहाय्य केंद्र स्थापन करण्यास मदत केली. त्यांचे समुपदेशन, कायदेशीर मदत आणि पुनर्वसनासाठी त्यांनी विविध सामाजिक संस्थांशी सहकार्य केले.

**४. सामूहिक विवाह संकल्पना**

सामूहिक विवाह संकल्पना हा समाजातील आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांसाठी महत्त्वाचा उपक्रम आहे. अशा विवाहांमुळे अनावश्यक खर्च कमी होतो आणि विवाह प्रक्रिया सुलभ होते. डॉ. सुवर्णा कराड यांनी या संकल्पनेला अधिक बळ देण्यासाठी अनेक सामूहिक विवाह सोहळे आयोजित केले.

**५. सामाजिक जागरूकता आणि नेतृत्व विकास**

महिलांना आपल्या हक्कांची जाणीव असावी आणि त्यांच्यात नेतृत्वगुण विकसित व्हावेत, यासाठी डॉ. सुवर्णा कराड यांनी विशेष उपक्रम राबवले. महिलांसाठी नेतृत्व प्रशिक्षण कार्यशाळा, महिला मेळावे आणि चर्चासत्रे आयोजित करून त्यांनी महिलांना पुढे येण्यासाठी प्रोत्साहित केले.

**पुरस्कार आणि सन्मान**

डॉ. सुवर्णा कराड यांच्या उल्लेखनीय कार्याची दखल घेत अनेक संस्थांनी त्यांचा गौरव केला. सामाजिक आणि शैक्षणिक क्षेत्रातील योगदानासाठी त्यांना 'वंजारी साहित्यरत्न' पुरस्कार मिळाला. तसेच, वर्धी वेलनेस फाउंडेशन, लखनऊतर्फे त्यांना राष्ट्रीय प्रतिष्ठा पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

**नवीन उपक्रम: वृद्धाश्रम उभारणी**

समाजातील वृद्ध नागरिकांसाठी सन्मानपूर्वक निवास मिळावा यासाठी त्या पुण्याजवळ एक भव्य वृद्धाश्रम उभारण्याच्या कार्यात व्यस्त आहेत. या उपक्रमासाठी त्यांना विविध सामाजिक कार्यकर्त्यांचे सहकार्य लाभत आहे. वृद्धांसाठी हे केंद्र केवळ निवासस्थान नसून, त्यांना वैद्यकीय सेवा, समुपदेशन आणि मनोरंजनाच्या सुविधा मिळतील, याचीही काळजी घेतली जात आहे.

**एक वर्षाची यशस्वी वाटचाल आणि पुढील दिशा**

डॉ. सुवर्णा कराड यांनी वंजारी महासंघाच्या महिला आघाडीच्या प्रदेशाध्यक्षपदाचा एक वर्षाचा कार्यकाळ यशस्वीरीत्या पूर्ण केला आहे. त्यांच्या प्रयत्नांमुळे समाजातील महिलांमध्ये आत्मनिर्भरता आणि सशक्तीकरणाची जाणीव निर्माण झाली आहे. त्यांनी घेतलेल्या पुढाकारामुळे अनेक महिलांचे जीवन सकारात्मकपणे बदलले आहे.त्यांच्या पुढील वाटचालीसाठी मनःपूर्वक शुभेच्छा! समाजहितासाठी त्यांचे योगदान असेच अविरत चालू राहो, हीच ईश्वरचरणी प्रार्थना. वाढदिवसानिमित्ताने त्यांना शुभेच्छा!

# चुकीच्या खाण्याच्या सवयीच नाही तर या कारणांमुळेदेखील होते ॲसिडिटी

लोकनेता न्यूज नेटवर्क

**वाघोली । संतोष कदम**

सिडिटी म्हणजेच अपचन ही एक सामान्य समस्या आहे, ही समस्या मुख्यतः चुकीच्या पद्धतीने पदार्थ खाण्याच्या सवयीमुळे उद्भवते. मात्र, त्यासाठी इतर अनेक गोष्टीदेखील कारणीभूत ठरू शकतात.आपल्यापैकी प्रत्येकांना कधी न कधी सिडिटीची समस्या झालीच असेल. ही अशी स्थिती आहे ज्यामध्ये अपचन, छातीत जळजळ, पोटदुखी, पोटात गॅस होणे, डोकेदुखी यांसारख्या समस्या उद्भवतात. हा पोटाचा विकार असून, पोटात जास्त प्रमाणात सिड तयार झाल्यामुळे ही समस्या उद्भवते. लहान मुलांपासून ते वृद्धांपर्यंत कोणत्याही वयोगटातील लोकांना सिडिटी होऊ शकते. खाण्यापिण्याच्या चुकीच्या सवयी आणि चुकीचा आहार ही सिडिटीची प्रमुख कारणे असल्याचे डॉक्टर आणि पोषणतज्ञ सांगतात. पण या व्यतिरिक्त इतरही काही गोष्टी जबाबदार असतात ज्यामुळे सिडिटी होते. चला तर मग जाणून घेऊया सिडिटी होण्याचे इतर कारणे आणि जोखीम घटकांबद्दल सविस्तर

**सिडिटीची लक्षणे ओळखा**

जेव्हा पोटात असलेले सिड जास्त प्रमाणात तयार होऊ लागते तेव्हा सिडिटी होते. हे सिड अन्न पचवण्यास मदत करते, परंतु जेव्हा सिड जास्त




प्रमाणात तयार होते किंवा पोटामध्ये चुकीच्या पद्धतीने पसरू लागते तेव्हा पोटात जळजळ, वेदना आणि इतर समस्या निर्माण होतात. यादरम्यान आंबट ढेकर येणे, खाल्ल्यानंतर किंवा रिकाम्या पोटी जळजळ होणे, तोंड आंबट होणे, पोट दुखी तसेच ते जड झाल्यासारखे वाटणे, घशात जळजळ होणे, कोरडा खोकला, मळमळ किंवा उलट्या होणे ही सर्व सिडिटीची लक्षणे आहेत.

**सिडिटी होण्याचे प्रमुख कारणे**

सिडिटीसाठी अनेक घटक कारणीभूत असू शकतात, त्यापैकी अन्नाशी संबंधित सवयी सर्वात प्रमुख कारण आहे. जास्त मसालेदार आणि तळलेले अन्न खाणे, चहा, कॉफी किंवा कार्बोनेटेड पेये यांचे अतिसेवन ही सिडिटीची प्रमुख कारणे आहेत. जेवल्यानंतर लगेच झोपायला जाणे, किंवा जेवणाची निश्चित वेळ नसणे, उपवास करणे, अतिचरबीयुक्त पदार्थांचे सेवन करणे, जंक फूड खाणे या गोष्टींमुळे देखील सिडिटी होऊ शकते.

**खाण्याच्या विकारांव्यतिरिक्त, जीवनशैलीशी संबंधित अनेक घटकांमुळे देखील सिडिटी होऊ शकते. अभ्यास दर्शविते की जे लोक धूम्रपान करतात आणि मद्यपान करतात त्यांना सिडिटी होण्याचा धोका अधिक असतो. या व्यतिरिक्त, जर तुम्ही जास्त तणाव आणि चिंताग्रस्त असाल तर त्यामुळे देखील तुम्हाला पोटाचे विकार होऊ शकतात.**

**– डॉ योगेश आहेर, खराडी, पुणे.**

**तुम्ही जेव्हा जास्त तणावाखाली आणि चिंताग्रस्त असाल, तेव्हा पुरेशी झोप घेतली जात नाही, तसेच या स्थितीत अनेकदा भूक देखील लागत नाही. दरम्यान बराच वेळ रिकाम्या पोटी राहिल्यास आणि मुबलक झोप न घेतल्यास सिडिटीचा त्रास होऊ शकतो.**

**– डॉ. ज्योती जाधव, वाघोली, पुणे.**

**काही औषधांमुळे देखील अपचनाची समस्या उद्भवू शकते. जी लोकं वेदनाशामक औषधे दीर्घकाळ घेतात किंवा स्टिरॉइड्स किंवा प्रतिजैविकांचे जास्त सेवन करतात त्यांनाही पोटाचा त्रास किंवा सिडिटीचा त्रास होतो. अशा परिस्थितीत, डॉक्टरांचा सल्ला घेणे आणि औषधे बदलणे आवश्यक आहे.**

**– डॉ. प्रतिभा वेताळ, चंदननगर, पुणे.**

# जुन्या आठवणींना विद्यार्थ्यांनी दिला उजाळा!

## सेवानिवृत्त ज्येष्ठांचा केला सन्मान



लोकनेता न्यूज नेटवर्क

**कंधार । धोंडीबा मुंडे**

कंधार तालुक्यातील फुलवळ येथील श्री बसवेश्वर विद्यालयाचे सेवानिवृत्त ज्येष्ठ मुख्य लिपिक गोविंदराव शंकरराव कुलकर्णी व प्रयोगशाळा सहाय्यक महेमुद पठाण यांचा बॅच १९९२– ९३ च्या वर्गमित्र विद्यार्थी–विद्यार्थिनी यांच्या वतीने यथोचित सन्मान करण्यात आला,त्यामुळे उतरत्या वयात आपल्या विद्यार्थ्यांनी केलेल्या सन्मानामुळे गुरुजन गहिवरून गेले.

सन्मानाचे औचित्या असे की दि.४ फेब्रुवारी रोज मंगळवारी रथसप्तमी निमित्त सौ. सुरेखा कैलासराव डांगे यांनी आपल्या सर्व १९९२–९३ च्या वर्ग मित्र – मैत्रीणीसाठी हळदी–कुंकू आणि स्नेह भोजन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

या कार्यक्रमास २४ वर्ग मैत्रिणी पतीसह सहभागी झाल्या होत्या. हळदी – कुंकू आणि स्नेह भोजन निमित्त आपल्याला ज्ञानाचे धडे देणारे आपल्या शाळेतील आणि फुलवळमध्येच स्थायिक असणाऱ्या सेवानिवृत्त ज्येष्ठ गुरुजनांचा सत्कार करावा, ही संकल्पना पुढे आली.आणि ही संकल्पना तातडीने सर्वानुमते मान्य करण्यात येऊन, विजयकुमार सादलापुरे यांनी यावेळी गावातील ज्येष्ठ नागरिक सेवानिवृत्त मुख्य लिपिक गोविंदराव शंकरराव कुलकर्णी व सेवानिवृत्त प्रयोगशाळा सहाय्यक महमूद पठाण यांचा सपत्नीक सत्कार करण्यात आला. या सत्कारामुळे सत्कारमूर्ती गुरुजन विद्यार्थ्यांच्या प्रेमामुळे भारावून गेल्याचे दिसून येत होते.हळदी – कुंकवाचा कार्यक्रम व सत्काराचा कार्यक्रम संपन्न होताच संध्याकाळी सौ. सुरेखा कैलासराव डांगे यांच्या घरी हळदी कुंकू आणि स्नेह भोजनाचा कार्यक्रम पार पडला. यावेळी विद्यार्थी – विद्यार्थिनी यांनी जुन्या आठवणींना उजाळा देऊन, स्नेह भोजनाचा आनंद घेतल्यामुळे फुलवळ गावांमध्ये आनंदाचे वातावरण पसरले असून, अशा कार्यक्रमांची परंपरा भविष्यात कायम ठेवून,आज बिघडत चाललेल्या नवतरुण विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करून व्यसनाधीनते पासून दूर करण्यासाठी प्रयत्न करावे, अशीही सर्वसामान्यांमधून अपेक्षा व्यक्त केल्याचे ऐकावयास मिळत होते.

# महादीप परीक्षेत जि.प.उच्च प्रा.शा.दगडवाडी शाळेचे यश

लोकनेता न्यूज नेटवर्क

**भोकरदन । राम शिंदे**

दिनांक ०५/०२/२०२५ वार बुधवारला जिल्हाधिकारी साहेब जालना यांच्या संकल्पनेतून आयोजित महादीप परीक्षा घेण्यात आली.

या महादीप परीक्षेत जि प उच्च प्रा शा दगडवाडी शाळेतील इयत्ता ७ वी ची विद्यार्थिनी* कु. शिवानी साहेबराव पांडे* हिने ५० पैकी ४३ गुण घेऊन जालना जिल्ह्यातून ७ वा क्रमांक पटकवीला त्यासाठी कु. शिवानीचे खूप खूप अभिनंदन व पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा .तसेच कु शिवानी साहेबराव पांडे हिचे विमानाने श्रीहरीकोटा येथे जाणाऱ्या सहलीसाठी निवड झाली आहे. शिवानी महादीप परीक्षेत यशस्वी झाल्याबद्दल तीचे जिल्हा परिषद सदस्य आशाताई मुकेश पांडे,शालेय व्यवस्थापन समिती अध्यक्ष शिवाजी पांडे,सर्व सदस्य सरपंच, सौ उपसरपंच मुख्याध्यापक व सर्व शिक्षक स्टॉफ जि प उच्च प्रा शा दगडवाडी यांच्याकडून खूप खूप अभिनंदन व कौतुक केले..



# प्रयागराज अयोध्या वाराणसी चित्रकुट यात्रेकरूंचे नांदेड मध्ये जल्लोषात स्वागत

लोकनेता न्यूज नेटवर्क

**नांदेड । बाजीराव पाटील गायकवाड**

१४४ वर्षानंतर आलेल्या महाकुंभामध्ये धर्मभूषण ड. दिलीप ठाकूर यांच्या नेतृत्वाखाली सहभागी झालेल्या ४५ यात्रेकरूंचे प्रयागराज,अयोध्या, वाराणसी, चित्रकूट यात्रा पूर्ण करून नांदेड येथे सुरक्षित आगमन झाल्याप्रित्यर्थ मध्यरात्री भव्य स्वागत करण्यात आले. प्रचंड गर्दीत देखील सर्वांसाठी दिलीप ठाकूर यांनी अयोध्येच्या राम मंदिरात व्हीआयपी दर्शनाची व्यवस्था केल्यामुळे सर्वांनी समाधान व्यक्त केले.

गेल्या पंचवीस वर्षापासून हजारो भाविकांना तीर्थयात्रा घडवून आणणारे दिलीप ठाकूर यांना महाकुंभ यात्रा काढण्यासाठी एक हजार पेक्षा जास्त भाविकांनी आग्रह केला होता.अतिप्रचंड गर्दीमुळे अत्यन्त कठीण वाटणारी ही यात्रा दिलीप ठाकूर यांच्या समयसुचकतेमुळे सुलभ झाली.पहिल्या टप्प्यात दिलीप ठाकूर यांच्या समवेत नांदेडसह मुंबई, पुणे, सोलापूर, संभाजीनगर, परभणी, लातूर,हैद्राबाद येथील ४५ यात्रेकरू व १ टूर मॅनेजर आणि ८ कॅटरिंग टीमचे सदस्य सहभागी झाले होते.७ दिवसाच्या कालावधीत बस,नाव,छोट्या बॅटरी रिक्षाचा वापर करून यात्रेकरुंनी प्रयागराज येथिल त्रिवेणी संगम येथे पवित्र स्नान केले. वाराणसी येथील नमो घाटावर गंगा स्नान करून काशी विश्वनाथ ज्योतिर्लिंग, कालभैरव मंदिरासह इतर प्रमूख मंदिराचे दर्शन घेतले. अतिप्रचंड गर्दीमुळे अयोध्या पासून ६५ किलो मिटर अंतरावर मोठ्या वाहनांना थांबविल्यामुळे सर्वजण अडचणीत आले होते. दिलीप ठाकूर यांनी उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांच्या निकटवृत्त्यांशी संपर्क साधल्यामुळे त्यांची बस अयोध्येपर्यंत आणता



आली. नवीनच बांधलेल्या श्रीराम मंदिराच्या दर्शनासाठी प्रचंड मोठी रांग लागलेली होती. ४६ भाविकांसाठी व्हीआयपी दर्शनाची व्यवस्था करण्यात आली. प्रभू रामचंद्राच्या आकर्षक मूर्तीचे मन भरून दर्शन घेतल्यामुळे अनेक भाविकांच्या डोळ्यात आनंदाश्रू आले. चित्रकूट येथे मंदाकिनी नदीत स्नान केल्यानंतर श्रीरामाच्या वनवास काळातील महत्त्वाच्या भागांना भेटी देण्यात आल्या. प्रवासाच्या शेवटच्या टप्प्यात रामटेक येथील पवित्र कुंडात सर्वांनी डुबकी मारली.प्रशस्त स्लीपर बस, उत्तम हॉटेल मधील सुसज्ज रूम मध्ये यात्रेकरूंच्या राहण्याची व्यवस्था करण्यात आली होती.दिलीप ठाकूर यांनी वेळोवेळी घेतलेले मनोरंजक खेळ, अंताक्षरी,प्रत्येक प्रवाश्यांवर केलेले मार्मिक विनोद यामुळे प्रवासाची रंगत वाढली.नांदेड येथील कॅटरिंग टीमने रुचकर महाराष्ट्रीयन भोजन व मिनरल वॉटर वेळेवर व मुबलक प्रमाणात दिल्यामुळे सर्वांची प्रकृती चांगली राहिली. प्रवासादरम्यान टूर मॅनेजर संतोष कदम यांनी सर्वांची वैयक्तिक काळजी घेतली.सुखरूप आलेल्या यात्रेकरूंचे नांदेड येथे मध्यरात्र असून देखील जल्लोषात स्वागत करण्यात आले. भाऊ ट्रॅव्हल्स व माय हॉलिडेज च्या वतीने अठरा मार्चला नेपाळ, एकतीस मार्च ला केरळ, सात एप्रिल ला हिमाचल, दोन व तेवीस मे ला चारोधामला रेल्वेने यात्रा जाणार असल्याची माहिती दिलीप ठाकूर यांनी दिली.प्रतिकूल परिस्थितीत देखील दिलीप ठाकूर व त्यांच्या टीमने अंत्यत नियोजनबद्ध व्यवस्था केल्याबद्दल सर्व यात्रेकरुंनी समाधान व्यक्त केले.

दैनिक लोकनेता



# देगलूर तालुक्यातील माध्यमिक व उच्च माध्यमिक सोळा केंद्रावर पाच हजार विद्यार्थ्यांची परीक्षा होणार

## परीक्षा केंद्रावर गैरप्रकार आढळून आल्यास परीक्षा केंद्राची मान्यता होणार रद्द बोर्डाचा मोठा निर्णय

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**देगलूर । जयपाल दावनगीरकर**

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळातर्फे येत्या फेब्रुवारी आणि मार्च २०२५ मध्ये इयत्ता १० वी आणि १२ वी च्या बोर्ड परीक्षा होणार आहेत या कालावधीत प्रत्येक परीक्षा केंद्रावर लाईव्ह नियंत्रण ठेवतील ज्या परीक्षा केंद्रावर गैरप्रकार आढळून येतील त्या परीक्षा केंद्राची मान्यता व शाळा / कॉलेज मान्यता पुढील वर्षापासून कायमस्वरूपी रद्द करण्याचा बोर्डाकडून लवकरच मोठा निर्णय घेण्यात येणार आहे.देगलूर तालुक्यातील १६ परीक्षा केंद्रावर इयत्ता १० वी व १२ वी ची बोर्ड परीक्षा माहे फेब्रुवारी – मार्च २०२५ मध्ये घेण्यात येणाऱ्या १६ परीक्षा केंद्रावर ४ हजार ८६७ विद्यार्थी परीक्षेस बसणार आहेत.

माध्यमिक इयत्ता १० वी तील विद्यार्थ्यांसाठी १० परीक्षा केंद्र आहेत. १) केंद्र क्रमांक ५१०० जि.प.हा.मुलींचे देगलूर विध्यार्थी संख्या २५०. २) केंद्र क्रमांक ५१०१ जि.प.हा. मुलांचे देगलूर विध्यार्थी संख्या २२५. ३) केंद्र क्रमांक ५१०३ जि.प.हा. हाणेगाव विध्यार्थी संख्या ३४४. ४) केंद्र क्रमांक ५१०४ जि.प.हा.करडखेड विध्यार्थी संख्या २४३ ५) केंद्र क्रमांक ५१०५ लोकमान्य टिळक माध्यमिक शाळा मरखेल विध्यार्थी संख्या २५३. ६) केंद्र क्रमांक ५१०६ जि.प.हा.शहापूर विध्यार्थी संख्या १९५. ७) केंद्र क्रमांक ५१०७ पोस्ट बेसिक आश्रम शाळा शिळवणी बॉर्डर तांडा विध्यार्थी संख्या १३५. ८) केंद्र क्रमांक ५१०८ सावित्रीबाई फुले माध्यमिक शाळा देगलूर विध्यार्थी संख्या ३००. ९) केंद्र क्रमांक ५१०९ साधना हायस्कूल देगलूर विध्यार्थी संख्या ३००. १०) केंद्र क्रमांक ५११० ज्ञान सरस्वती इंग्लिश स्कूल देगलूर विध्यार्थी संख्या २६९. या दहा माध्यमिक परीक्षा केंद्रावर परिक्षार्थी एकूण संख्या २ हजार ५१४ परीक्षेस बसणार आहेत या परीक्षेत परिक्षक कार्यालयाची संख्या दोन आहे व तसेच उच्च माध्यमिक १२ वी साठी एकूण ६ परीक्षा केंद्र असून १) केंद्र क्रमांक १५६ देगलूर कॉलेज देगलूर विध्यार्थी संख्या ७००. २) केंद्र क्रमांक १५७ कै. धुंडा महाराज ज्यु. कॉलेज देगलूर विध्यार्थी संख्या २८८. ३) केंद्र क्रमांक १५८ मानव्य विकास ज्यु. कॉलेज देगलूर विध्यार्थी संख्या २३४. ४) केंद्र क्रमांक १५९ आश्रम शाळा शिळवणी बॉर्डर तांडा विध्यार्थी संख्या ३३१. ५) केंद्र क्रमांक १६० कै. इंदिराबाई देशमुख ज्यु. कॉलेज हाणेगाव विध्यार्थी संख्या ३१७. ६) केंद्र क्रमांक १६१ श्री. छत्रपती शिवाजी कॉलेज मरखेल विध्यार्थी संख्या ४८३ या सहा उच्च माध्यमिक परीक्षा केंद्रावर परिक्षार्थी एकूण संख्या २ हजार ३५३ विध्यार्थी माध्यमिक व उच्च माध्यमिक एकूण ४ हजार ८६७ विध्यार्थी परीक्षेस बसणार आहेत.

देगलूर तालुक्यात या वर्षीच्या परीक्षेसाठी खालील प्रमाणे नियोजन करण्यात आले आहे. माध्यमिक शालांत इयत्ता १० वी परीक्षेची सुरुवात दिनांक २१ फेब्रुवारी ते १७ मार्च २०२५ पर्यंत अंतिम आहे यावेळी एकूण परिक्षार्थी संख्या २ हजार ५१४ विध्यार्थी तसेच उच्च माध्यमिक १२ वी च्या परीक्षेची सुरुवात दिनांक ११ फेब्रुवारी ते १८ मार्च परीक्षेची अंतिम दिनांक हि राहिल या परीक्षेसाठी सोळा परीक्षा केंद्रावर परिक्षार्थी एकूण संख्या ४ हजार ८६७ विद्यार्थ्यांवर सोळा केंद्र संचालक, सोळा आवश्यक बैठे पथक, पर्यवेक्षक, परिरक्षक, बैठे पथकामध्ये महसूल विभागातील एक, ग्राम विकास विभागातील विविध खात्यामध्यील एक, व तालुकास्तरावरील शिक्षण विभागातील एक असे कमाल तीन जणांचे बैठे पथक प्रत्येक केंद्रावर नेमण्यात येणार असून परीक्षा सुरू होण्यापूर्वी अर्धा तास व परीक्षा संपल्यानंतर उत्तर पत्रिका पाकीट बंद करे पर्यंत परीक्षा केंद्रावर पुर्ण वेळ बैठे पथक उपस्थित राहण्याचे स्पष्ट निर्देश देण्यात येत आहेत बैठे पथक परीक्षा कालावधीत होणारे गैरप्रकार रोखण्यासाठी सर्वतोपर करण्यात येऊन कारवाई करण्याचे निर्देश देण्यात येत आहेत. देगलूर हे तेलंगणा व कर्नाटक राज्याच्या सिमे लगत असल्याने परीक्षा केंद्रावर कॉपी बहाद्दराचा सुळसुळाट असतो त्या परीक्षा केंद्राच्या ठिकाणी परिक्षार्थीचे नातेवाईक कॉप्या पुरवठा करीत असताना तसेच माध्यमिक शाळा व उच्च माध्यमिक मधील काही शिक्षक / प्राध्यापकांनी प्रत्येक केंद्रातील ४० ते ५० विध्यार्थ्यांना हाताशी धरून पास करतो म्हणून चार आकड्याच्या रक्कमा उकळले जातात याची वाच्यता उघडकीस करण्यासाठी एका वृत्तपत्राच्या माध्यमातून प्रसिद्ध करण्यासाठी प्रतिनिधी / वार्ताहर व लाईव्ह कसं चित्रीकरण केला म्हणून पोलीस कर्मचाऱ्यांत खळबळ उडाली होती काही कारण नसताना विनाकारण तेव्हा कामात अडथळा केला अशी गुन्ह्याची नोंद करून कोर्टाचे पायऱ्या चढ उतार करावं लागलं होतं हे कुटीर कारस्थान शाळा – कॉलेज संचालक मंडळाच्या सहकार्याने या सिमेवरती भागात असं काही घटना घडल्या जातात या परीक्षा केंद्रावर गैरप्रकार रोखण्यासाठी उपाय करणे योग्य राहील याची दक्षता पथकाने घेतीलच अशी अपेक्षा सुज्ञानी व्यक्तींकडून होत आहे.

दरम्यान बारावीची परीक्षा ११ फेब्रुवारी ते १८ मार्च या कालावधीत तर दहावीची परीक्षा २१ फेब्रुवारी ते १७ मार्च या कालावधीत होत आहे दोन्ही परीक्षा नियोजित तारखेपेक्षा दहा दिवस अगोदर होणार आहेत. बारावीला २३५३ तर दहावीला २५१४ विध्यार्थी परिक्षेला बसणार आहेत.

## जगद्गुरु श्री नरेंद्राचार्य महाराज यांचा आंबेजोगाई येथील

# पादुका दर्शन सोहळ्यामध्ये ५५ गोरगरीब व गरजू महिलांना शिलाई मशीनचे वाटप

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**बीड । विजय रोडे**

अंबाजोगाई अनंत श्री विभूषित जगद्गुरु रामानंदाचार्य श्री स्वामी नरेंद्राचार्यजी महाराज यांच्या दिव्य पादुकांचे दर्शन अंबेजोगाई येथे हजारो भाविक भक्तांनी घेतले .सकाळी ८ ते संध्याकाळी ९ वाजेपर्यंत पूर्ण दिवसभर कार्यक्रम सुरू होता.

२८ जानेवारी रोजी मंगळवारी अंबेजोगाई येथे सकाळीच ९ वाजता आंबेजोगाई येथील छत्रपती शिवाजी महाराज चौक येथून मिरवणुकीला सुरुवात झाली. मिरवणुकी मध्ये समोर बॅन्जो गाडी, त्याच्या पाठी मागे मिरवणुकीचा बॅनर, कलशधारी महिला, निशाण धारी महिला, संबळ



पथक, निशाण धारी पुरुष, वासुदेव पथक, ५ घोडे आणि ६ ऊंट यांच्यावर महापुरुषांचे वेगवेगळे देखावे, भजणी मंडळ, माऊलींचा रथ, ५ ट्रॅक्टर ट्रॉली मध्ये शाळेतील विद्यार्थ्यांचे वेगवेगळे देखावे आणि त्यांच्या पाठीमागे इतर भक्तगण अशी मिरवणूक डॉ.बाबासाहेब आंबेडकर चौक मार्गे कार्यक्रम स्थळी १२ वाजता पोहोचली. संत पिठावर आल्यावर स्वामींची आरती करण्यात आली, त्यानंतर बीड जिल्ह्यातील राजकीय मान्यवरांच्या हस्ते गोर गरीब व गरजू महिलांना ५५ शिलाई मशीनचे वाटप करण्यात आले. त्यानंतर चिठ्ठ्या टाकून भक्तगणातून एका भाविकांची लहान मुलांच्या हाताने चिठ्ठी काढण्यात आली त्यांच्या हस्ते संतपिठावरील गुरु पूजन व मंडप मधील भक्तगणांचे गुरुपूजन झाले, त्यानंतर जनम. प्रवचनकार सौ. तनवी मोरे ताईंचे प्रवचन झाले. त्यानंतर सर्व भाविकांना महाप्रसादाची सोय करण्यात आली होती .सर्वांनी महाप्रसादाचा आस्वाद घेतला, या कार्यक्रमांमध्ये ४०६ भक्तगणांनी भक्त दीक्षा घेतल्या. त्यानंतर सिद्धपादुकाच्या दर्शना साठी भाविकांच्या लांब पर्यंत रांगा लागल्या होत्या रात्री ९ पर्यंत दर्शन चालू होते .त्यानंतर सिद्ध पादुका पुढील कार्यक्रमासाठी रवाना झाल्या. या भव्य दिव्य कार्यक्रमासाठी आयोजक, जगद्गुरु नरेंद्राचार्यजी महाराज भक्त सेवा मंडळ अंबेजोगाई व बीड जिल्हा यांच्या वतीने अथक परिश्रम घेण्यात आले आणि कार्यक्रम संपन्न झाला.

# संध्या छाया वृध्दाश्रम मालेगाव रोड नांदेड येथे देहदान जनजागृती

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**नांदेड । प्रतिनिधी**



दिनांक ०७/०२/२०२५ रोजी डॉ. शंकरराव चव्हाण शासकीय वैद्यकीय महाविद्यालय विष्णुपुरी, नांदेड येथील शरीररचना शास्त्र विभाग यांच्या वतीने व मा.अधिष्ठाता डॉ. सुधीर देशमुख साहेब व विभाग प्रमुख डॉ. अनिसुर रेहेमान साहेब यांच्या मार्गदर्शनाने संध्या छाया वृद्धाश्रम मालेगाव रोड नांदेड, येथे डॉ. महेश शिंदे साहेब सहाय्यक प्राध्यापक, प्रयोगशाळा तंत्रज्ञ श्री किशन गीते यांनी देहदान जनजागृती कार्यक्रम घेतले व त्यांना देहदान करण्यासंदर्भात प्रेरित केले. यावेळी संस्थेचे व्यवस्थापक श्री विक्रम पाटील साहेब व वृद्धाश्रमातील राहणारे सर्व वृद्ध महिला व पुरुष व्यक्ती उपस्थित होते. यावेळी डॉ. महेश शिंदे यांनी देहदाना संदर्भात सविस्तर माहिती दिली. तसेच वृद्धाश्रमातील बहुतांश व्यक्ती या ग्रामीण भागातील वास्तव्यात असलेल्या व्यक्ती होत्या त्यामुळे देहदान करून ही आपल्याला पुण्य कसे मिळवता येते याबाबतीत सरळ सोप्या भाषेत तेथील वृद्धांना समजावून सांगितले व एका व्यक्तीने देहदान केल्यावर वीस ते पंचवीस डॉक्टर तयार होतात व ते समाजाची सेवा करतात आणि त्या लाखो समाजातील व्यक्तींचे त्या देहदान करणाऱ्या व्यक्तीला आशीर्वाद रुपी पुण्य लाभते असे त्यांनी समजावून सांगितले. तसेच श्री किशन गीते यांनी देहदानासाठी लागणाऱ्या कागदपत्रांची सविस्तर माहिती दिली. त्यानंतर आमच्या विभागामार्फत वृद्धाश्रमातील राहणाऱ्या व्यक्तींना छोटासा फळरुपी अल्पोपहार देण्यात आला. व शेवटी विभागाच्या वतीने श्री आकाश भोसले (कनिष्ठ लिपिक) यांनी वृद्धाश्रमातील व्यक्तींचे व व्यवस्थापक यांचे आभार व्यक्त केले.

# दहा गुंठ्यात एका लाखाचे उत्पन्न आवरा, आनंद मुंडकरनी वाहिल्या घामाच्या धारा

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**नायगाव । माधव बैलकवाड**

नायगाव तालुक्यातील मौजे चारवाडी येथील प्रगतिशील शेतकरी आनंद गंगाराम पाटील मुंडकर यांनी आपल्या शेतात आवरा शेंगा,कांदा,वांगे यासह इतर पिके त्यांनी लागवड केली आपले कष्ट कधीच वाया जात नाहीत या आशयाने त्यांनी अपार कष्ट करीत काबाडकष्ट करून फक्त दहा गुंठ्यात जवळपास एक लाख रुपयांचे उत्पन्न त्यांनी काढली.

अत्यंत नम्रता अंगी असलेले माणुसकीचे जीवन जगत आनंद गंगाराम पाटील मुंडकर यांनी दहा गुंठ्यात आवरा लागवड केली जगाची उचापती न करता आपल्या शेतात काबाडकष्ट करीत आपली शेती आवरा,कांदा, वांगे,कापूस,ज्वारी या पिकाने फुलवली. एखाद्या कामानिमित्त जाताना त्यांच्याशी सहजासहजी भेटीचा क्षण, एका पातलंभर भाताच्या शिताची जशी पारख



करता येते तशी काही शब्दातच त्यांच्यातील माणुसकी दिसून आली,घामाच्या धारा आनंद मुंडकर यांच्या चेहऱ्यावरून वाहत होत्या,त्यांना मदत त्यांची मुलगी आणि मुलगा करीत होते,त्यांच्या मुलीचा गोंडस बाळ थंड छायेत शांत झोपलेला होता,त्याची खेळणी सुद्धा बाजूला निपचित पडली होती या कुटुंबाच्या चेहऱ्यावर प्रसन्नता दिसून येत होती हे पाहून मी त्यांना सहज म्हटले आपण केलेल्या या लागवडीमध्ये समाधान आहोत काय ? त्यावर आनंद मुंडकर म्हणाले दहा गुंठ्यात एक लाख रुपयांचे उत्पन्न कमावले बाकी अजून कांदा उत्पन्न वांगा उत्पन्न आहेच अजून काय पाहिजे, अगदी मी खूप समाधान आहे असे म्हणत आनंद मुंडकरच्या चेहऱ्यावरचा आनंद अधिकच दिसून आला. एखाद्या शहरात गेले तर उपाशी जीवन जगावे लागते पण ग्रामीण भागात अजूनही माणुसकी जिवंत आहे इथं प्रेम माया जिव्हाळा आणि माणुसकी दिसून येते हे कोण्या बाजारात विकत मिळत नाही परंतु खेड्यात मात्र आनंद मुंडकर यांच्या रूपातून पहावयास मिळाली, अतिशय बोटावर मोजण्याइतके घरे असलेलं चारवाडी गाव हे गाव खूप लहान आहे पण तेथील माणसाचे मन् मोठे आहेत जी माणसं अपार कष्ट करतात स्वतः स्वाभिमानाचे जीवन जगत जगाला जगवितात हा आनंद कोण्या मंदिरात, शहरात दिसत नाही पण चारवाडीत मात्र आनंद दिसतो.

## जलजीवन मिशनची बंद असलेली कामे तात्काळ चालू करण्यासाठी

# जिल्हाधिकाऱ्यांनी शासनाकडे पाठ पुरावा करावा-वसंत सुगावे पाटील

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**नांदेड । बाजीराव पाटील गायकवाड**

नांदेड जिल्ह्यात मागील दोन वर्षांपासून पाणीपुरवठा विभागाचे जलजीवन मिशनचे काम चालू होते पण शासनाकडे या कामांसाठी निधी नसल्यामुळे ही कामे कंत्राटदारानी बंद केली आहेत.त्यामुळे अनेक गावांत कामे अपूर्ण असून मा. जिल्हाधिकारी यांनी लक्ष घालून राज्य शासनाकडे पाठपुरावा करून या कामांविषयी प्रलंबित असलेल्या मागण्या ची पूर्तता करून कामे पूर्ववत चालू करावी अशी मागणी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे प्रदेशसरचिटणीस वसंत सुगावे पाटील यांनी जिल्हाधिकारी यांच्याकडे केली आहे.

सध्या उन्हाळा चालू झाला असून जिल्ह्यात अनेक गावांत पाणी प्रश्न मोठया प्रमाणावर भेडसावत असून अशात सदर कामे ही अर्धवट व अपूर्ण आहेत .याबाबत जिल्हाधिकारी यांनी लक्ष घालून



शासनाकडे या कामांबाबत पाठपुरावा करून बंद असलेली कामे तात्काळ चालू करावी अशीही मागणी या निवेदनाद्वारे करण्यात आली.तसेच यावेळी नव्याने रुजू झालेले नांदेड चे नूतन जिल्हाधिकारी राहूल कर्डिले यांचा सत्कार राष्ट्रवादी काँग्रेस च्या पदाधिकाऱ्यांच्या वतीने सत्कार करण्यात आला. यावेळी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे शहर कार्याध्यक्ष फेरोज पटेल राष्ट्रवादी काँग्रेस सहकार सेलचे प्रदेश कार्याध्यक्ष बालाजीराव शेळके,राष्ट्रवादी काँग्रेस ग्रंथालय सेलचे प्रदेश कार्याध्यक्ष संतोष दगडगावकर ,राष्ट्रवादी काँग्रेस सेवादल जिल्हाध्यक्ष रमेश गांजापूरकर, श्रीकांत मांजरमकर ,राष्ट्रवादी काँग्रेस सेवादल जिल्हा उपाध्यक्ष सत्तार अहेमद शेख,आनंद सूर्यवंशी, युवक उपाध्यक्ष शेख इरफान,आदी* पदाधिकारी उपस्थित होते.

# डिकसळ येथे होम मिनिस्टर कार्यक्रम संपन्न ;वैष्णवी भादेकर ठरल्या पैठणीच्या मानकरी

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**इंदापूर । बबनराव धायतोंडे**

रथ सप्तमीच्या दिवशी ग्रामपंचायत डिकसळ ता.इंदापूर,जि.पुणे व चंदुकाका सराफ प्रा.लि.एम.आय.डी.सी बारामती शाखा यांच्या संयुक्त विद्यमाने डिकसळ येथे माता योगेश्वरी च्या मंदिरासमोर हळदी कुंकवाचा व होम मिनिस्टर कार्यक्रम घेण्यात आला. कार्यक्रमाची सुरुवात माता योगेश्वरी च्या आरतीने झाली व डिकसळ गावच्या विद्यमान सरपंच मनिषा संदीप गवळी तसेच ग्रामपंचायत सदस्या ज्ञानेश्वरी कुंभार, मनिषा पवार,जयश्री सवाने,पूजा पोंदकुले,सदस्य सुनिल काळे,दत्तात्रेय पवार आणि पोलीस पाटील संदीप पवार चंदुकाका सराफ प्रा.लि. यांच्याकडून ग्रामपंचायतीच्या सर्व सदस्यांचा सत्कार करण्यात आला.यावेळी दिपक वाबळे बारामतीकर यांचा होम मिनिस्टर चा कार्यक्रम घेण्यात आला त्यामध्ये देवा फाउंडेशन तर्फे पैठणी देण्यात आली व चंदुकाका सराफ प्रायव्हेट लिमिटेड एमआयडीसी बारामती शाखेतर्फे सोन्याची नथ,चांदीचे नाणे आणि फॉर्मिंग ठुशी देण्यात आली यात पैठणीचे प्रथम विजेत्या वैष्णवी सोमनाथ भादेकर या रल्या.द्वितीय क्रमांकाची सोन्याची नथ ज्ञानेश्वरी कुंभार यांना मिळाली,तृतीय क्रमांकाचे चांदीचे नाणे माधुरी भोसले यांना मिळाले,चतुर्थ क्रमांकाची फार्मिंग ची ठुशी पूजा पोंदकुले यांना मिळाली. आलेल्या सर्व महिलांना चंदूकाका सराफ प्रा.लि.एमआयडीसी बारामती शाखेतर्फे हळदी कुंकू लावून वान देण्यात आले. चंदूकाका सराफ प्रा.लि.एमआयडीसी बारामती शाखेचे मॅनेजर अमित झेंडे तसेच मार्केटिंगचे सागर मदने,सचिन जाधव व इतर स्टाफ यांचा सत्कार ग्रामपंचायत डिकसळ मार्फत करण्यात आला.अशाप्रकारे हळदी कुंक आणि होम मिनिस्टर कार्यक्रम खेळीमेळीच्या वातावरणात संपन्न झाला.



# भोकर पोलिसांची अवैद्य रेती वाहकावर धडक कार्यवाही तर तालुका महसूल प्रशासनाचे बोटचेपे धोरण

लोकनेता न्यूज नेटवर्क

**भोकर । रमाकांत जोशी**

गोदावरी नदीपात्रातील रेतीचा अवैध उपसा करून विक्री करण्याचा गोरख धंदा महसूल विभागातील कथीत भ्रष्ट कर्मचारी अधिकाऱ्यांच्या आशीर्वादाने तालुक्यात बिनधास्त सुरू असून, तालुका महसूल प्रशासनाने बोटचेपे धोरण स्वीकारल्यामुळे भोकर पोलिसांना अवैध रेती वाहतुकी विरुद्ध कारवाईचा बडगा उगारावा लागत आहे.





रेतीची काळ्या बाजारात चढ्या दराने विक्री केली जात आहे. भोकर शहर व तालुक्यात अवैध मार्गाने रेती येत असून यातून कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होत असल्याची माहिती भोकर पोलिसांना मिळताच भोकर पोलीस स्टेशन चे कर्तव्यदक्ष पोलीस निरीक्षक अजित कुंभार, सहा. पोलीस निरीक्षक औटे, पो.उपनि. सुरेश जाधव, सोनपारखे, पंकज हणवते पोहेकॉ सोमदत्त पुल्लागोर, यांनी ०४ फेब्रुवारी चे रात्री अंदाजे ११ : ३० वाजता रात्रगस्त पेट्रोलिंग करत असताना मुदखेड चौक येथे सापळा रचून अवैध रेतीचा हायवा ट्रक ज्याचा क्रमांक एम एच २६ सी एच १६२९ पकडला तर दुसऱ्या घटनेत ०२ फेब्रुवारी चे रात्री अंदाजे ०८ : ३० वाजता रात्रगस्त पेट्रोलिंग करत असताना टिप्पर क्रमांक एम एच ०४ जी एफ ०४९९ या दोन्ही घटनेत ३० हजार रुपयांची वाळू आणि ३० लाख रुपयांची वाहने असा एकूण ३० लाख ३० हजार रुपयांचा मुद्देमाल पोलिसांनी जप्त केला आहे. याप्रकरणी विविध कलमान्वये त्यांच्याविरुद्ध भोकर पोलीस ठाण्यात गुन्हा नोंद करण्यात आला आहे.तत्कालीन तहसीलदार यांच्या कार्यकाळात राबविण्यात आलेली गौणखणीज उत्खनन व वाहतुकीची निर्माण केली गेलेली परंपरा संबंधित कर्मचारी, नूतन तहसीलदार यांना माहिती होऊ न देता प्रभावीपणे राबविली जात असल्याने अवैध मुरूम, रेती माफियांना चांगले दिवस आले आहेत. भोकर तालुक्यात विनाअडथळा व सोयीच्या हप्त्यात महसुल प्रशासनाकडून मदतीचा हात पुढे केला जात असल्याचे बोलल्या जात आहे, अवैध रेती वाहतुकीसाठी ट्रक वाल्यांमध्ये शर्यत सुरू झाली असल्याचे दिसून येत आहे. तहसीलदारांची प्रत्येक हालचाल रेतीवाल्यांपर्यंत पोहोचत असल्यामुळे दस्तुरखुद तहसीलदारांनी रेती वाहतुकीवर आळा टाकण्यासाठी कितीही प्रयत्न करून अपयशी ठरत आहेत. रेती तस्करांना मदत करणाऱ्या झारीतील शुक्राचार्य असलेल्या कर्मचाऱ्यांचा शोध घेऊन त्यांच्या विरोधात कायदेशीर कार्यवाही करणे उचित ठरणार आहे.अवैध धंद्यातून कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होत असतील तर असे अवैध धंदे कायद्याच्या चौकटीत बंद केले जातील. रेती तस्करांमध्ये वाढलेली दादागिरी व त्यातून निर्माण होणारा कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न याची परिमीमांसा करून रेतीच्या हायवा, टिप्पर पकडण्याची मोहीम राबवली जात आहे. कायदेशीर रित्या रॉयल्टी असेल तरच मुरूम किंवा रेतीच्या हायवा रस्त्यावर चालवावेत अन्यथा माझ्याशी गाठ असणार आहे असा इशारा भोकर पोलीस स्टेशन चे पोलीस निरीक्षक अजित कुंभार यांनी दिला आहे.

## उमरीत आयसीडीएस,टपालसह अनेक कार्यालय भाड्याच्या इमारतीत

लोकनेता न्यूज नेटवर्क

**उमरी । महेश पडोळे**

उमरी तालुक्याची स्थापना होऊन २४ वर्ष पूर्ण झाले आहेत. या तालुक्यात काही शासकीय कार्यालयाला अद्याप स्वतंत्र इमारत नसल्यान ही कार्यालये किरायाच्या इमारतीत थाटले आहेत. ही उमरी तालुक्याची शोकांतिकाचा विषय म्हणावे लागेल. सध्याला अनेक योजना राज्य व केंद्र शासन राबवित आहेत. येणाऱ्या अनुदान असो की, महिला व मुला मुलींच्या, ज्येष्ठांच्या आधी योजनेचे पैसे थेट खात्यावर पडत असल्याने लाभार्थ्यांनी आपले खाते टपाल कार्यालयात उघडले. त्यामुळे खातेदारांची संख्या वाढली. टपाल कार्यालयाला जागा कमी असल्याने अडचण होत आहे. या टपाल कार्यालयाला स्वतःची जागा असून त्या जागेवर अनेकांनी अतिक्रमण करून आपले दुकाने मांडले. दुसरीकडे एकात्मिक बाल विकास प्रकल्प कार्यालय असून हे कार्यालय गणेशनगरातील इमारतीत महिना १२ हजार रुपये भाडे देवून थाटले आहे.

गटशिक्षण कार्यालय याला तीच परिस्थिती असून अद्याप याही विभागाला स्वतंत्र इमारत नसल्याने चक्क अर्धे कार्यालय पंचायत समिती विभागात तर अर्धे कार्यालय हे जुन्या उमरीतील कन्या शाळा जिल्हा परिषद उमरी येथील समूह साधन इमारतीत आहे. जिल्हा परिषद पाणी पुरवठा विभाग उमरी याही कार्यालयाला अद्याप स्वतंत्र इमारत नसल्याने हे कार्यालय उर्ध्व पैनगंगा विभागाच्या कार्यालयात येथील भरते. तसेच भूमी अभिलेख विभागालाही स्वतंत्र इमारत नसल्याने हे तहसील कार्यालयात आपले कार्यालय थाटले. अशा अतिमहत्वाच्या विभागाच्या कार्यालयाला स्वतंत्र इमारत उभी नसल्याने अडचणीचा सामना करावे लागत असल्याची माहिती त्या त्या विभागातील विभाग प्रमुखांनी प्रतिनिधीशी बोलताना दिली आहे.

## भाकरीची भ्रांत मोठी;रोजगाराच्या शोधात कामगारांचे स्थलांतरण

लोकनेता न्यूज नेटवर्क

**शिराढोण । दौलत पांडागळे**






'रोजचंच मडं आणि त्याला कोण रडं ' ग्रामीण बोलीभाषेतील रूढ म्हण अगदी सहजपणे कामगारांच्या मुखातून बाहेर पडते.वाडी तांड्यावरील हाताला काम नसल्याचे शल्य कितीही असले तरी चार चौघात उघडपणे हे वाक्य सहजपणे बोलल्या जाते.हे अपयश कुणाचं ?या प्रश्नाच्या शोधापेक्षा खरीप हंगाम संपल्यावर कामगारांचे थवे कामाच्या शोधात शहराकडे धाव घेतात कारण भाकरीची भ्रांत त्यांच्यासाठी मोठी असते.रोजगाराच्या शोधातील स्थलांतरण असे चित्र प्रतिवर्षी शिराढोण परिसरात पाहायला मिळते.शिराढोण परिसर कोरडवाहू शेतीक्षेत्र जादा असल्याने निसर्गाने साथ दिली तर जेमतेम उदरनिर्वाहासाठी आधार होतो परंतु प्रपंचाचा गाडा सुरळीत हाकण्यासाठी कामगारांना रोजगाराच्या शोधात भटकंती करावी लागते.शिराढोणसह परिसरातील तांडे, वड्या, यासह जवळपासच्या गावातील शेकडोंच्या संख्येने अल्पभूधारक शेतकरी,भूमिहीन शेतमजूर आता शहरी भागाकडे कामाच्या शोधात स्थलांतरित झाले आहेत.नवविवाहितेसह अनेक जोडपे विटकाम,ऊसतोड आदी कामांसाठी राज्यातील शहरी भागासह राज्याबाहेर स्थलांतरीत झाले आहेत.भाकरीच्या भ्रमंतीत घरातील चिमुकले,उद्याचे भविष्य मात्र शिक्षणावाचून अधांतरी राहतात आणि पुढची ऊसतोड कामगारांची टोळी तयार होते.या दुर्दैवाचे धनी कोण? मागील अनेक वर्षापासून मतदारांच्या तोंडाला पाने पुसण्याचा कार्यक्रम सत्ताधारी मंडळींकडून होतो.

आमदार आणि खासदार केवळ सहानुभूतीपर भेटीसाठीच येतात पाच वर्षे लोटली की,पुन्हा पाण्याची व्यवस्था करू,बेरोजगारांच्या हाताला काम देऊ,अमुक उद्योग आणणार,स्थलांतर थांबवू , आशा केवळ अश्वासनांच्या खैराती वाटण्याचा कार्यक्रम चालतो. वर्षानुवर्षे होणारी कामगारांची परवड आणि सततचे स्थलांतरण यामुळे मुलांचे शैक्षणिक नुकसान होत आहे असा सूर जनमतातून निघत आहे.

## शिधा-पत्रिकाधारकांनी ई-केवायसी २८ फेब्रुवारी पर्यंत पूर्ण करण्याचे तहसीलदार अजित दिवटे यांचे आवाहन!

लोकनेता न्यूज नेटवर्क

**सिंदखेड राजा । ज्ञानेश्वर बुधवत**







तालुक्यातील प्रधानमंत्री गरीब कल्याण अन्न योजना व अन्न नागरी पुरवठा विभागामार्फत सर्व शिधापत्रिकाधारकांची ई-केवायसी२८ फेब्रुवारी पर्यंत सर्व शिधापत्रिका धारकांनी (सत्यापन) करणेबाबत विशेष मोहीम सुरू असून या मोहिमेअंतर्गत सर्व शिधापत्रिकाधारकांना आपल्या कुटुंबातील सर्व सदस्यांची ई-केवायसी. २८ फेब्रुवारी पर्यंत करणे बंधनकारक असून सर्व लाभधारकानी इ केवायसी करून घेण्याचे आवाहन तहसीलदार अजित दिवटे यांनी केले आहे आहे.

महाराष्ट्र शासन अंतर्गत तहसिल कार्यालय, सिंदखेड राजा अंतर्गत सर्व प्रधानमंत्री गरीब कल्याण अन्न योजना सिंदखेड राजा तालुक्यातील सर्व नागरिकांना आवाहन करण्यात येते की, अन्न नागरी पुरवठा विभागामार्फत सर्व शिधापत्रिकाधारकांची ई-केवायसी (सत्यापन ) करणेबाबत विशेष मोहीम सुरू असून या मोहिमेअंतर्गत सर्व शिधापत्रिकाधारकांना आपल्या कुटुंबातील सर्व सदस्यांची ई-केवायसी करणे बंधनकारक आहे. आपली शिधापत्रिका आणि आधार कार्ड घेवून दिनांक २८ फेब्रुवारी २०२५ पूर्वी सर्व शिधापत्रिकाधारकांनी आपल्या सर्व कुटुंबातील सदस्यांची स्वस्त धान्य दुकानात जावून ई-केवायसी (सत्यापन) पूर्ण करून घ्यावी. जे शिधात्रिकाधारक ई- केवायसी करणार नाही, त्यांचे धान्य बंद झाल्यास अथवा अपात्र ठरल्यास स्वतः शिधात्रिकाधारक ह्यास जबाबदार राहतील. त्यामुळे पुनश्च सिंदखेड राजा तालुक्यातील सर्व शिधात्रिकाधारकांना आवाहन करण्यात येते की, कोणीही अन्नधान्यापासून वंचित राहू नये याकरिता त्वरित आपल्या स्वस्त धान्य दुकानात जावून ई-केवायसी (सत्यापन) पूर्ण करून घ्यावे व प्रशासनास सहकार्य करावे.असे आवाहन तहसीलदार अजित दिवटे यांनी केले आहे.

## राजर्षीशाहू संकुलामध्ये दहावी व बारावी च्या विद्यार्थ्यांचा निरोप समारंभ संपन्न




लोकनेता न्यूज नेटवर्क

**पारध । रमेश जाधव**

पारध येथील राजर्षी शाहू शैक्षणिक संकुलात इयत्ता दहावी आणि बारावीचा निरोप समारंभ संपन्न झाला यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून बुलडाणा येथील गोल्डन ट्रॅंगल हॉटेल मॅनेजमेंट इन्स्टिट्यूट चे संचालक श्री विजय शिरसाट तर कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. राजाराम डोईफोडे उपस्थित होते. संस्थापक सचिव डॉ. सुखदेव मांटे यांनी दूरदृश्य प्रणाली द्वारे विद्यार्थ्यांना शुभेच्छा दिल्या. मेडिकल आणि इंजीनियरिंग सोडून विद्यार्थ्यांनी टुरिझम, हॉटेल मॅनेजमेंट आणि आर्टिफिशियल इंटेलिजन्स सारख्या क्षेत्राकडे वळलं पाहिजे तसेच नोकरी शोधण्यापेक्षा व्यवसायात उतरल पाहिजे असे प्रतिपादन श्री विजय शिरसाठ यांनी यावेळी केले. मंचावर महाविद्यालयाचे अधीक्षक किशोर वाघ, कनिष्ठ महाविद्यालयाचे प्राचार्य अमोल बांडगे, मुख्याध्यापक विलास लोखंडे व मराठी विभाग प्रमुख प्रा.अनिल मगर उपस्थित होते. निरोप समारंभाचे सूत्रसंचालन प्रा.मंगेश लोखंडे तर आभारप्रदर्शन प्रा. राजू धनवई यांनी केले, कार्यक्रमाचे यशस्वीतेसाठी प्रा.धनराज भोसले, श्री.निलेश लोखंडे, प्रा.दिनेश कापरे, प्रा.लक्ष्मण खरात, श्री.अनिल लक्कस, प्रा. दिलीप सोनुने, विश्वास लोखंडे, संजय तबडे, भागवत पानपाटील, अधिकार पाटील, राहुल सुरडकर, आदींनी परिश्रम घेतले.

## दिपभारती विद्यालयात माता रमाई यांची जयंती साजरी

लोकनेता न्यूज नेटवर्क

**भोकरदन । राम शिंदे**



सम्राटअशोक शिक्षण संस्था भोकरदन संचलित दिपभारती माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय दानापूर या शाळेत माता रमाई यांची जयंती साजरी करण्यात आली .कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शाळेचे मुख्याध्यापक श्री वाय. एस.गवळी होते . त्यांनी रमाईच्या प्रतिमेला पुष्पहार घालून पूजन केले. श्री.एस.डी.पवार यांनी माता रमाईच्या जीवनावर प्रकाश टाकला काही विद्यार्थीनींनी आपले मनोगत व्यक्त केले .कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी सर्व शिक्षकांनी परिश्रम घेतले .कार्यक्रमाला सर्व विद्यार्थी शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते .

## पंढरी भद्रे यांची सब इन्स्पेक्टर पदी पदोन्नती

लोकनेता न्यूज नेटवर्क

**नायगाव । प्रतिनिधी**



नायगाव येथील राजश्री शाहू महाराज नगरीतील रहिवासी देशाच्या सेवेत अहोरात्र योगदान देणारे सैनिक आयुष्यमान पंढरी शिवलिंग भद्रे बेटक बिलोलीकर यांची सिआरपिएफ मध्ये ३२ वर्ष सेवा पूर्ण करून सब-इंस्पेक्टर (एस.आय.) पदी पदोन्नती व नियुक्ती झाली आहे, त्यामुळे छत्रपती शाहू महाराज नगरातील हितचिंतक आयुष्यमान आशोक गायकवाड , मंगेश हानवटे , यशवंत डूमणे , नागोराव डूमणे, संजय भद्रे, विनोद डुमणे, रवि थोरात, दिलीप मोरे, जगदीश वंजारे, सतिष कांबळे, बाबुराव झगडे, रमेश भद्रे, प्रकाश सोनकांबळे, राहूल झगडे, बालाजी हानवटे, राहुल इंगळे, सुनील पोटफोडे, कामाजी झगडे, राजेंद्र वाघमारे, राजरत्न जोंधळे, प्रमोद घंटेवाड, प्रदिप राक्षेसमारे, रूपेश गायकवाड, सिद्धार्थ गायकवाड, अजय डुमणे या सर्वांच्या वतीने पंढरी भद्रे यांचा सन्मान व सत्कार करुन सर्वसामान्य गोरगरीब नागरीक रक्षणासाठी अहो रात्र रक्षण होवो अशा भावनेने त्यांचे मनस्वी अभिनंदन व भावी कार्यास हार्दिक शुभेच्छा देण्यात आलेल्या वेळी भद्रे परिवार व समस्त शाहू नगर वाशीयांच्या वतीने आपणास दीर्घ आयुष्य लाभो, व आपली अशीच भरभराटी होवो अश्या ही सदिच्छा देण्यात आल्या आहे.

हे पत्रक,मालक,मुद्रक, प्रकाशक संपादक ज्ञानेश्वर भाऊसाहेब मुंढे यांनी न्यू गीता प्रिंटिंग प्रेस मिरकाळा ता गेवराई जि बीड ४३११२७ येथे छापून दैनिक लोकनेता कार्यालय हो.नं ५०,मेन रोड मिरकाळा ता गेवराई जि बीड ४३११२७ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले आहे. मो.नं ८४५९९७७९०४

This Newspaper is printed by owner, printer, publisher editor Dyaneshwar Bhausaheb Mundhe at New Geeta Printing Press Mirkala Ta Gevrai District Beed 431127 and published at Dainik Lokneta Office Ho.No. 50, Main Road Mirakala Ta Gevarai District Beed 431127 (Maharashtra) Mo no 84599 77904